**नमुना क्र. ३२**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**

**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)]**

| | | |
|---|---|---|
| | **ग ड चि रो ली ये थी ल स त्र न्या या ल या त**<br>**पिठासन अधिकारी : श्री उत्तम मु. मुधोळकर**<br>**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**<br><br>**न्यायनिर्णयाचा दिनांक : –११/०३/२०२४**<br>**विशेष बाल संरक्षण खटला क्र. ६६/२०२२** | |
| | अपराध क्र. : ३४७/२०२१<br>पोलीस ठाणे : आष्टी, तहसील - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली | |
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, आष्टी,<br>जिल्हा - गडचिरोली |
| अभियोग पक्षातर्फे | | विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान |
| **आरोपी** | | **सचिन विलास सोनटक्के**<br>वय १८ वर्षे, धंदा - मजुरी,<br>राहणार - जामगिरी,<br>तालुका - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली |
| आरोपी तर्फे | | विद्वान विधिज्ञ श्री. उमेश कुकडकर |

**भाग 'ब'**

**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | ०४/१२/२०२१ |
| पहिली खबरची तारीख | ०६/१२/२०२१ |
| दोषारोपपत्राची तारीख | ११/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | २१/११/२०२३ |
| जबाब नोंदणी सुरु झाल्याची तारीख | १८/१२/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | …….. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०३/२०२४ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रक्रिया सुरु असताना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा कालावधीचा फौ. प्र.सं.च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **आ१** | **सचिन विलास सोनटक्के** | ०८/०८/२०२२ | १७/०९/२०२२ | भादंसं कलम ३६३, ३७६ (२)(न) आणि बालैंगुसंका ४ आणि ६ अन्वये | निर्दोष मुक्त | ... | ... |

**भाग 'क'**
**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]**
**सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **ससा१** | पीडित बालिका | पीडिता |
| **ससा२** | पीडित बालिकेची आई | फिर्यादी |
| **ससा३** | सतिश अरुण कावळे | पंच साक्षीदार |
| **ससा४** | वैद्य शशिकांत कृष्णदास बदेला | वैद्यकीय साक्षीदार |
| **ससा५** | गणेश पांडुरंग जंगले | पोलीस साक्षीदार / तपास अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | निशाणी स-१८/ससा१ | जन्मतारखेचा दाखल्याची प्रत |
| २. | निशाणी स-१९/ससा१ | न्यायदंडाधिकारी यांनी कलम १६४ फौ.प्र.सं. अंतर्गत नोंदविलेला पीडित मुलीचा जबाब |
| ३. | निशाणी स-२१/ससा२ | फिर्याद |
| ४. | निशाणी स-२२/ससा२ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ५. | निशाणी स-२३/ससा२ | न्यायदंडाधिकारी यांनी कलम १६४ फौ.प्र.सं. अंतर्गत नोंदविलेला जबाब |
| ६. | निशाणी स-२५/ससा३ | पत्र |
| ७. | निशाणी स-२६/ससा३ | घटनास्थळ पंचनामा |
| ८. | निशाणी स-२७/ससा३ | घटनास्थळ पंचनामा |
| ९. | निशाणी स-२९/ससा४ | आष्टी पोलिस ठाणे यांचेकडून वैद्यकीय अधिका-यांना दिलेले पत्र |
| १०. | निशाणी स-३०/ससा४ | पीडित बालिकेचा वैद्यकीय अहवाल |
| ११. | निशाणी स-३१/ससा४ | पीडित बालिकेचे डिस्चार्ज कॉर्ड |
| १२. | निशाणी स-३४/ससा५ | न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा यांना जनुकीय संच मिळणेसाठी दिलेले पत्र |
| १३. | निशाणी स-३५/ससा५ | आरोपीचे जनुकीय नमुने मिळणेसाठी वैद्यकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |
| १४. | निशाणी स-३६/ससा५ | पिडीत बालीकेचे जनुकीय नमुने मिळणेसाठी वैद्यकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| १५. | निशाणी स-३७/ससा५ | रक्ताचे नमुने परिक्षणासाठी प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर यांना दिलेले पत्र |
| १६. | निशाणी स-३८/ससा५ | कर्तव्य परवाना |
| १७. | निशाणी स-३९/ससा५ | मुद्देमाल प्रयोगशाळेत पोहच केल्याबाबतची पोहच पावती |
| १८. | निशाणी स-४०/ससा५ | कर्तव्यपूर्ती अहवाल |
| १९. | निशाणी स-४१/ससा५ | पिडीत बालीका व इतर साक्षीदारांचे फौ.प्र.सं. कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्याकरीता न्यायदंडाधिकारी, चामोर्शी यांना दिलेले पत्र |
| २०. | निशाणी स-४२/ससा५ | आरोपीचा अटक नमुना |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | --निरंक-- | .. |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | निशाणी १३ | जनुकीय अहवाल |

**ड. महत्त्वाचे वस्तु :**

| अ.क्र. | महत्त्वाच्या वस्तुंचे क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | मव ''अ'' | घटनास्थळाचे एक छायाचित्र |
| २. | मव ''ब'' व ''क'' | घटनास्थळाचे दोन छायाचित्रे |

| MHGA010008372022 | दाखल तारीख | : | ११/१०/२०२२ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | ११/१०/२०२२ |
| | निकाल तारीख | : | ११/०३/२०२४ |
| | कालावधी | : | **०१ व. ०५ म. ०० दि.** |
| | **निशाणी क्र. ४५** | | |

**ग ड चि रो ली ये थी ल स त्र न्या या ल या त**

**(पिठासन अधिकारी श्री उत्तम मु. मुधोळकर)**
**(अतिरिक्त सत्र न्यायाधीश)**

**विशेष बाल संरक्षण खटला क्र. ६६/२०२२**

**महाराष्ट्र शासन तर्फे**
पोलीस ठाणे अधिकारी,
पोलीस ठाणे, आष्टी,
तहसील - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली ... **अभियोग पक्ष**

**-विरुद्ध-**

**सचिन विलास सोनटक्के**
वय २१ वर्षे, धंदा - मजुरी,
राहणार - जामगिरी
तहसील - चामोर्शी, जिल्हा - गडचिरोली ... **आरोपी**

.........................................................................................

अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री.अनिल प्रधान
आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. नितेश लोडल्लीवार

.........................................................................................

**भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३६३, ३७६(२)(न) तसेच बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ कलम ४, ६ अन्वये दोषारोप**

.........................................................................................

**मौखिक न्यायनिर्णय**
(दिनांक ११/०३/२०२४)

**१.** वर नमूद आरोपी विरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० कलम ३६३, आणि ३७६(२)(न) (ज्याचा संक्षेपाच्या कारणाकरीता यापुढे ‘‘भादंसं’’ असा उल्लेख केला आहे) तसेच बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ (ज्याचा

संक्षेपाच्या कारणाकरीता यापुढे ''बालैंगुसंका'' असा उल्लेख केला आहे) कलम ४ आणि ६ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपाखाली खटला भरण्यात आलेला आहे.

२. सदर खटल्यासंदर्भात दोषारोपपत्रात नमूद असलेले अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

मुळ फिर्यादी ही पीडित बालिकेची आई असून तिने दिनांक ०६/१२/२०२१ रोजी आष्टी पोलीस ठाण्यात अशी फिर्याद दिली की, पीडित बालिका, जी १७ वर्षे वयाची होती, दिनांक ०४/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० च्या सुमारास महाविद्यालयात जाण्यासाठी घराबाहेर निघून गेली तथापि, ती घरी परत आली नाही. तिचा सर्वत्र शोध घेवून सुद्धा ती मिळून आली नाही. त्यामुळे अज्ञाताने पीडित बालिकेला तिच्यावर अत्याचार करण्याच्या उद्देशाने पळवून नेले आहे अशी निशाणी क्र.२१ ची फिर्याद पीडित बालिकेच्या आईने आष्टी पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यानुसार वरील भादंसं कलमान्वये गु.नों.क्र.३४७/२०२१ दाखल झाला. सदर गुन्ह्याचे तपासकाम अन्वेषण अधिकारी श्री. गणेश जंगले यांना सोपविण्यात आले. ०९ महिन्याच्या कालावधीनंतर पिडीत बालीका पोलीसांना मिळून आली आणि तिला पोलीस ठाण्यांत आणले असता तिने पोलीसांना असा जबाब दिला की, आरोपी आणि तिचेमध्ये प्रेमसंबंध असल्याने त्यांचेत वारंवार शारीरीक संबंध येत होते. त्यानंतर दिनांक ०४/१२/२०२१ रोजी दोघांनी ठरविल्यानुसार ते दोघे घरातून पळून तेलंगणा राज्यात पतीपत्नीप्रमाणे राहू लागले. तेथे सुध्दा त्यांचेत वारंवार शारीरीक संबंध आल्याने ती गर्भवती झाली. तिच्या जबाबानुसार सदर गुन्हयाला बालैंगुसंका या कायद्याखाली कलम ४ व ६ लागू करण्यांत आले. तपासकामी त्यांनी घटनास्थळी धाव घेवून पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, छायाचित्रे घेतली. त्याचप्रमाणे त्यांनी आरोपीस अटक केली आणि आवश्यक त्या सर्व साक्षीदारांची टिपणे नोंदविली. पीडितेची व आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन अहवाल प्राप्त करुन घेतला. पीडित बालिकेच्या जन्मतारखेबाबतचा लेखी पुरावा तसेच इतर कागदोपत्री पुरावा प्राप्त करण्यात आला. दोषारोपपत्रात नमूद केलेप्रमाणे आरोपीने गुन्हा केल्याचे त्यांना तपासकामी निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपीविरुद्ध खटला चालविण्यासाठी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**३.** यथावकाश आरोपी न्यायालयात हजर झाला. आरोपीविरुद्ध लावण्यात आलेले दोषारोप विचारात घेवून निशाणी क्र.१५ येथे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३६३, आणि ३७६(२)(न) तसेच बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ कलम ४ आणि ६ अन्वये या न्यायालयाने दोषारोप निश्चित केले. त्याला गुन्हा कबूल नसल्याचे आरोपीने कथन करुन त्याच्याविरुद्ध कामकाज पुढे सुरु ठेवण्याची त्याने विनंती केली.

**४.** दोषारोपातील कथनासमर्थनार्थ अभियोग पक्षाने तोंडी तसेच लेखी पुरावा न्यायपटलावर सादर केला.

**५.** आरोपीचा गुन्हयामध्ये दिसणारा सहभाग विचारात घेवून फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला. त्याने कोणताही गुन्हा केलेला नसून तो निष्पाप व निर्दोष असल्याचे त्याने कथन केले.

**६.** अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान आणि आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.नितेश लोडल्लीवार यांचा दिर्घ युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे विद्वान लोकअभियोक्ता श्री. अनिल प्रधान यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, आरोपीविरुद्धचा दोषारोप अभियोग पक्षाने योग्य त्या पुराव्याआधारे शाबित केलेला आहे. त्यामुळे आरोपीला कायद्याप्रमाणे कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. सबब, आरोपीला न्यायोचित अशी कठोर शिक्षा देण्याची त्यांनी विनंती केली. याउलट, आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. नितेश लोडल्लीवार यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, न्यायपटलावर दाखल केलेला पुरावा हा आरोपीविरुद्धचा दोषारोप शाबित करणेस सक्षम नाही आणि त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता होणे आवश्यक आहे. सबब, आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याची त्यांनी न्यायालयाला विनंती केली.

**७.** आरोपीविरुद्ध असलेला दोषारोप आणि उभयपक्षकारांचा युक्तीवाद विचारात घेता पुढीलप्रमाणे वादबिंदू निश्चित करण्यात आले असून त्यांचे सकारण निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | वादबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास येनापूर येथून आरोपीने, तो तिचा विधीसंमत पालक नसताना, पीडित बालिकेचे तिच्या विधीसंमत पालकांच्या ताब्यातून अपनयन केले, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ? | नाही |
| २. | दिनांक ०४/१२/२०२१ ते ०७/०८/२०२२ या कालावधीत विविध ठिकाणी आरोपीने पीडित बालिकेवर वारंवार बलात्कार केला, जी संमती देण्यास असमर्थ होती, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ? | नाही |
| ३. | वर नमूद कालावधीत आणि ठिकाणी आरोपीने पीडित बालिकेवर अंतर्भेदी लैंगिक हल्ला आणि विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला केला, असे अभियोग पक्ष शाबित करतो काय ? | नाही |
| ४. | आरोपीविरुद्ध दोषसिद्धी झाली काय ? | नाही |
| ५. | कोणता आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

### वादबिंदु क्र. १ ते ४ बाबत

८. वर नमूद सर्व वादबिंदू हे परस्परावलंबी तसेच एकमेकांत गुंतलेले असल्याने पुराव्याचे रसग्रहण व विचारांचे प्रकटीकरण सुलभ होण्यासाठी तसेच चर्चेची पुनरुक्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे निर्णीत केलेले आहेत.

९. आरोपीविरुद्ध असलेल्या दोषारोप शाबितीसाठी अभियोग पक्षाने तोंडी तसेच लेखी पुरावा न्यायपटलावर सादर केलेला आहे. तशा शाबितीसाठी अभियोग पक्षाने एकुण पाच साक्षीदारांचा पुरावा न्यायपटलावर सादर केलेला आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार पीडित बालिकेवर लैंगिक अत्याचार झालेला आहे आणि त्या घटनांबाबत तिचा जबाब पोलिसांनी तसेच न्यायदंडाधिकारी यांनी नोंदवलेला आहे आणि त्यामुळे ती अभियोग पक्षाची अत्यंत महत्वाची आणि जिची साक्ष निर्णायक ठरु शकते अशी साक्षीदार आहे. त्यामुळे दोषारोप शाबितीसाठी न्यायालयात झालेला तिचा तोंडी पुरावा हा अत्यंत महत्वाचा असून खटल्याचे भवितव्य तिच्या पुराव्याचा दर्जा आणि सामर्थ्य यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

**१०.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.1 म्हणजेच पीडित बालिका हिने तिच्या शपथेवरील पुराव्यात असे कथन केले की, ती व आरोपी यांच्यात प्रेमसंबंध होते आणि त्यानंतर एकमेकाशी लग्न करण्याची इच्छा होती. तिचे प्रेमप्रकरणांबाबत तिचे आईवडील तिचेवर रागाविल्यामुळे तिने त्याला असे सुनावले की, ''मला माझे घरी राहायचे नाही. आपण घर सोडून निघून जावू. तु मला घेवून गेला नाहीस तर मी मरते.'' त्यामुळे तो नाईलाजास्तव तिचे बरोबर पळून जाण्यास तयार झाला. त्यानंतर ते दोघे तेलंगणा राज्यात पळून गेले आणि तेथील एका खोलीमध्ये राहू लागले. त्या काळात त्यांचेत वारंवार शारीरीक संबंध आले आणि त्यामुळे ती दोन महिन्याची गर्भवती झाली. तिने पुढे असेही कथन केले की, तपासा दरम्यान तिला पोलीसांनी महिला व बाल रुग्णालय गडचिरोली येथे दाखल केले होते आणि वैद्यकीय अधिकारी यांना तिने तिचेसोबत झालेल्या सर्व घटना सांगितल्या होत्या. तिने पुढे असेही कथन केले की, न्यायदंडाधिकारी यांनी तिचा नि.क्र. १९ चा जबाब नोंदविला होता. तिचे सरतपासाकडे बारकाईने पाहिले असता असे सुस्पष्ट होते की, पलायन तसेच शारीरीक संबंध याबाबत तिने स्पष्टपणे कथन केले आहे. तथापि तिचे असे ठाम कथन आहे की, तिची वास्तव जन्मतारीख १४/१०/२००४ अशी नसुन ती १४/१०/२००० अशी आहे. थोडक्यात, सरतपासातच सदर साक्षीदाराने तिचे वयाच्या अज्ञानतेबाबत दोषारोपामधील अभियोग पक्षाच्या कथनास भगदाड पाडले. तिची नेमकी जन्मतारीख किती आहे याचा तिने स्पष्ट उलगडा तिच्या पुराव्यात केलेला आहे. सदरच्या पुराव्यावरून असे स्पष्ट होते की, पिडीत बालिकेने तिचे वयाबाबत दोषारोपातील कोणत्याही कथनांचे समर्थन केलेले नाही. त्यामुळे असे स्पष्टपणे अनुमान काढता येईल की, सदरच्या आरोपामध्ये सत्यांश अथवा तथ्यांश यांचा अभाव आहे. यांस दुजोरा म्हणून की काय आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये तिने अभियोग पक्षाच्या विरुद्ध आणि बचाव पक्षाच्या हितामध्ये अत्यंत महत्वाच्या अशा पुढील कबुल्या दिलेल्या आहेत.

> *''माझी नेमकी जन्मतारीख किती आहे ते सचिन यास माहित नव्हते हे म्हणणे खरे आहे. माझे आईवडील अडाणी व निरक्षर आहेत हे म्हणणे खरे आहे. माझे आईवडीलांचे चुकीमुळे शासन दरबारी माझी जन्मतारीख १४.१०.२००४ अशी चूकीची नमुद झाली हे म्हणणे खरे आहे. तशी तारीख त्यांनी अधिकारी यांना अंदाजे सांगितल्यामुळे नमुद झाली हे म्हणणे खरे आहे. माझी वास्तव जन्मतारीख १४.१०. २००० अशी आहे हे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी मी आईवडीलांचे घर*

*सोडले त्यावेळी मी १९ वर्षाची होती हे म्हणणे खरे आहे. त्यावेळीच माझे आईवडील माझेसाठी स्थळ शोधत होते हे म्हणणे खरे आहे. अन्य मुलाबरोबर लग्न करण्याची माझी इच्छा नसल्यामुळे मी स्वच्छेने घराबाहेर पडले होते हे म्हणणे खरे आहे. घर सोडून जाण्यास माझेवर कोणीही दबाव टाकला नव्हता हे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी मी चामोर्शी न्यायदंडाधिकारी यांचेकडे गेले त्यावेळी माझेसोबत महिला पोलीस हजर होती हे म्हणणे खरे आहे. मी सांगेन तशीच जन्मतारीख न्यायालयात सांगावी लागेल असे महिला पोलीसांने मला सुनावल्यामुळे मी तशी जन्मतारीख न्यायालयात सांगितली हे म्हणणे खरे आहे. दोषारोपपत्रात नमुद केल्याप्रमाणे आरोपीने माझेविरुध्द कधीही गुन्हयाचे कृत्य केलेले नाही हे म्हणणे खरे आहे. माझी त्याचेविरुध्द कधीही व कसलीही तक्रार नव्हती आणि नाही हे म्हणणे खरे आहे.' '*

**११.** वर नमूद कबुल्या या स्पष्ट व निर्णायक स्वरुपाच्या आहेत. त्या भांबावलेल्या विशिष्ट मन:स्थितीत अथवा गैरसमजुतीने दिल्या आहेत, असे अजिबात वाटत नाही. सदर कबुल्या या अभियोग पक्षाच्या दोषारोपपत्रातील कथनास अत्यंत मारक व नाशकारी अशा स्वरुपाच्या आहेत. पीडितेने तिच्या पुराव्यात तिची वास्तव जन्मतारीख सांगितली आहे. तसेच ती वयाने अज्ञान असताना आरोपीने तिचेसोबत शरीरसंबंध प्रस्थापित केलेले नाहीत, असे ती ठामपणे सांगते. तिची वास्तव जन्मतारीख १४.१०.२००० अशी असून तिच्या आईवडिलांच्या अडाणीपणामुळे तिची चुकीची जन्मतारीख शासन दरबारी कशी नोंद झाली याचे विश्लेषण तिच्या उलटतपासात तिने केलेले आहे. सदरच्या विश्लेषणास तिच्या आईने तिच्या पुराव्यात एक प्रकारे दुजोराच दिलेला आहे. त्यामुळे तिच्या वर नमूद पुराव्यावरुन असे निश्चितपणे अनुमान काढता येईल की, अभियोग पक्ष सांगत असलेल्या घटनेच्यावेळेस ती सज्ञान होती आणि ती सज्ञान असल्यामुळे ती स्वत:चे निर्णय स्वत: घेण्यास सक्षम होती. त्यामुळे दोषारोपपत्रात आरोपीविरुद्ध अपनयन तसेच बलात्कार याबाबत जे काही अभियोग पक्षाचे कथन आहे, त्या कथनास या महत्वाच्या साक्षीदाराकडून बळकटी मिळत नसल्यामुळे दोषारोप शाबितीसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास केवळ निरुपयोगी ठरतो.

**१२.** दोषारोपातील कथनाच्या समर्थनार्थ अभियोग पक्षाने नि.क्र.२० येथे पीडित बालिकेच्या आईची साक्ष नोंदवलेली आहे. त्यामध्ये तिने प्रामुख्याने असे कथन

केले की, पीडित बालिका घरात मिळून न आल्याने तिने तिचा सर्वत्र शोध घेतला आणि अज्ञाताने तिला पळवून नेले असावे असे तिला वाटल्याने तिने नि.क्र.२१ व २२ ची फिर्याद दाखल केली. त्याचप्रमाणे त्यावेळी ती वयाने अज्ञान होती. तसेच आठ महिन्यानंतर पोलीसांनी तिला घरी परत आणले. ती पुढे असेही कथन करते की, चामोर्शी न्यायदंडाधिकारी यांनी तिचा नि.क्र. २३ चा जबाब नोंदविला होता. याव्यतिरिक्त, सदर साक्षीदार तसेच पीडित बालिका आरोपीविरुद्ध कोणतेही मारक अथवा नाशकारी विधान करत नाही. त्यामुळे आरोपीने अज्ञान पीडित बालिकेला फुस लावून पळवून नेले होते आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते, या अभियोग पक्षाच्या कथनास या साक्षीदाराकडून बळकटी मिळत नाही. यांस दुजोरा म्हणून की काय आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्याने अभियोग पक्षाच्या विरुद्ध आणि बचाव पक्षाच्या हितामध्ये अत्यंत महत्वाच्या अशा पुढील कबुल्या दिलेल्या आहेत.

> *''मी व माझे पतीला लिहिता वाचता येत नाही तथापि आम्ही फक्त अंगठा अथवा सहीच करतो हे म्हणणे खरे आहे. पिडीत बालीकेची वास्तव जन्मतारीख १४.१०.२००० अशी आहे हे म्हणणे खरे आहे. माझे पतीचे व माझे अडाणी पणामुळे पिडीत बालीकेची जन्मतारीख शासन दरबारी व शाळेत १४.१०.२००४ अशी चूकीची नमुद झाली आहे हे म्हणणे खरे आहे. तिला विवाह करण्याचा नसल्याने तिच्या मन मर्जीने ती घर सोडून निघून गेली होती हे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी मी चामोर्शी न्यायदंडाधिकारी यांचेकडे गेले त्यावेळी माझेसोबत महिला पोलीस हजर होती हे म्हणणे खरे आहे. मी सांगेन तसा जबाब न्यायालयात दयावा लागेल असे महिला पोलीसांने मला सुनावल्यामुळे मी तसा जबाब न्यायालयात दिला हे म्हणणे खरे आहे. दोषारोपपत्रात नमुद केल्याप्रमाणे आरोपीने पिडीत बालीकेविरुध्द गुन्हयाचे कृत्य केलेले नाही हे म्हणणे खरे आहे. आरोपीविरुध्द आमची अथवा पिडीत बालीकेची कधीही व कसलीही तक्रार नव्हती व आजही नाही हे म्हणणे खरे आहे.''*

**१३.** वर नमुद कबूल्या या दोषारोपपत्रामधील अभियोगपक्षाच्या कथनांना अत्यंत मारक व नाशकारी अशा स्वरुपाच्या आहेत. दोषारोपामधील अति महत्वाच्या कथनांचे उच्चाटन सदरच्या कबूल्या करतात. थोडक्यात दोषारोपपत्रात नमूद असलेल्या आरोपीविरुद्धच्या आरोपांची शाबिती करण्यास वर नमूद दोन्ही साक्षीदारांचा पुरावा निरुपयोगी ठरतो.

**१४.** घटनेचेवेळी पीडिता ही वयाने अज्ञान होती आणि दोषारोपपत्रात नमूद केलेप्रमाणे आरोपीने तिचेवर लैंगिक अत्याचार केले, या कथनाच्या समर्थनार्थ अभियोग पक्षाने नि.क्र. २८ येथे वैद्य शशिकांत बदेला यांची साक्ष नोंदवलेली आहे. त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी असे ठळकपणे कथन केले की, त्यांनी वैद्यकीय अधिकारी या नात्याने पोलिसांच्या विनंतीवरुन पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्याचा प्रयत्न केला असता पिडीत बालीकेने तिचे सोबत घडलेल्या घटना तसेच आरोपीचा असलेला त्या घटनांमधील सहभाग याबाबत माहिती दिली तथापि तिची वैद्यकीय तपासणी करु दिली नाही. त्यामुळे तिचेवर लैगिंक अत्याचार झाले अगर कसे याबाबत कोणतेही मत प्रकट करण्यास त्यांना अजिबात वाव राहिला नाही. तथापि उच्चगामी ध्वनीलहंरीच्या गुणधर्मांचा वापर करुन शरीराच्या अंतर्गत अवयवांचे चिरफाड न करता अवलोकन करणारे तंत्रज्ञान, ज्याला इंग्रजीमध्ये सोनोग्राफी म्हणतात, याच्या आधारे तिची पाहणी केली असता ती दहा आठवडे आणि सहा दिवसाची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले आणि त्यानुसार त्यांनी निशाणी क्र. ३० चा अहवाल आणि इतर महत्वाची कागदपत्रे तयार करुन पोलिसांकडे सुपुर्त केली. सदर साक्षीदाराच्या उलटतपासाकडे नजर टाकली असता असे दिसून येईल की, आरोपीच्या हितामध्ये सदर वैद्यकीय अधिकारी यांनी कोणतीही महत्वाची कबुली दिलेली नाही. तरी सुद्धा दोषारोप सिद्धिसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा सुद्धा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही, असे ठळकपणे दिसून येते. पीडित बालिका जरी गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले असले तरी आरोपीने पीडितेशी ठेवलेले लैंगिक संबंध ती अज्ञान असताना ठेवले की सज्ञान असताना याबाबत स्पष्ट उलगडा होत नाही. त्यामुळे आरोपीने पीडितेवर ती वयाने अज्ञान असताना लैंगिक अत्याचार केले, या अभियोग पक्षाच्या दोषारोपास अजिबात दुजोरा मिळत नाही. पीडितेची जन्मतारीख किती आहे आणि घटनेच्यावेळी खरोखरच ती वयाने अज्ञान होती अगर कसे, याबाबत सदर वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतंत्र व सखोल पडताळणी केलेली दिसत नाही. पीडितेची जन्मतारीख निश्चित करण्यासाठी सदर साक्षीदाराकडून कोणत्याही कागदपत्राची स्वतंत्र व सखोल छाननी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे वैद्यकीय तपासणीचेवेळी पीडित बालिका ही वयाने अज्ञान होती की सज्ञान याची निश्चिती सदर साक्षीदाराकडून होत नाही. तथापि, पीडित बालिकेने तसेच तिच्या आईने पीडित बालिका ही फिर्याद देताना वयाने सज्ञानच होती असे

ठामपणे सांगितले आहे. अशा परिस्थितीत, उलटतपासामध्ये जरी सदर साक्षीदाराचा पुरावा हा अखंडीत, अबाधित आणि अभेद्य राहिला असला तरी सुद्धा दोषारोप शाबितीसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

**१५.** तपासकामाच्या दरम्यान प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी पीडित बालीकेचा नि.क्र. १९ चा आणि तिचे आईचा नि.क्र. २३ चा जबाब फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेला आहे, हे शाबित करण्यासाठी ते जबाब दाखल केलेले आहेत. सदरच्या जबाबातील मजकूरास त्या दोघींनी त्यांच्या सरतपासात सहमती दर्शविलेली असले तरी त्यांच्या उलटतपासावरुन असे स्पष्ट होते की,ते त्यांचे जबाब स्वेच्छा जबाब नसून पोलिसांच्या इशा-यावरुन त्या दोघींनी तशा मजकुराचा जबाब न्यायालयात दिला अशी स्पष्ट कबुली त्या दोघी त्यांच्या उलटतपासात देतात. अशा परिस्थितीत, जरी ते जबाब न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांनी नोंदविलेले असले तरी पण ते निष्फळ व निष्प्रभावी ठरतात. त्यामुळे सुद्धा आरोपीने अपहरण करुन पीडित बालिकेवर लैंगिक अत्याचार केले, या अभियोग पक्षाचा दोषारोप निष्फळ ठरतो. याबाबतीत आपण **कर्नाटक राज्य -वि- पी. रवीकुमार** या खटल्यातील न्यायनिर्णय जो **२०१९(३) महाराष्ट्र लॉ जर्नल (क्रि) पृष्ठ क्र.३०९** येथे प्रकाशित झालेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो, ज्यामध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने** असे मत प्रकटन केलेले आहे की,

> *''न्यायदंडाधिकारी यांनी फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेल्या जबाबाला ज्यावेळी अभियोग पक्षाचा साक्षीदार त्याच्या न्यायालयातील साक्षी पुराव्याच्यावेळी पुष्टी देत नाही अथवा सहमती दर्शवत नाही, त्यावेळी सदर जबाबाचे कोणतेही महत्व उरत नाही कारण असा जबाब हा सारात्मक अथवा मुख्य पुरावा या सदरात मोडत नाही.''*

**१६.** अशा परिस्थितीत, सदर जबाब सुद्धा निष्फळ ठरतो आणि आरोपीविरुद्ध असलेल्या दोषारोप सिद्धीसाठी त्याचा काहीच उपयोग होत नाही.

**१७.** याकामी दाखल असलेला इतर कागदोपत्री पुरावा म्हणजेच निशाणी क्र. ४२ चा आरोपी अटकेचा पंचनामा, नि.क्र.२६ व नि.क्र. २७ चे घटनास्थळाचे पंचनामे आणि तपासी अंमलदार यांनी केलेले पत्रव्यवहार, हे होय. सदरचे सर्व लेख पुराव्यामध्ये

विचारात घेता येतील. सदर सर्व कागदपत्रांवरुन अधिकतर इतकेच अनुमान काढता येईल की, त्यामध्ये घटनास्थळावरील परिस्थिती नमूद आहे. या व्यतिरिक्त, इतर कोणतेही अनुमान काढण्यासाठी सदर कागदपत्रांचा अभियोग पक्षास उपयोग होत नाही. न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा नागपूर यांचेकडील रासायनिक विश्लेषण अहवाल नि.क्र. १३ येथे असून त्यामध्ये नमुद केलेल्या निष्कर्षानुसार घेतलेल्या रक्ताचे नमुने हे पिडीत बालीका आणि आरोपी यांच्या जनुकांचे आहेत. पिडीत बालीकेच्या गर्भात वाढणारे भ्रूणाचे पितृत्व आरोपीकडे जाते असे दर्शविणारा सुस्पष्ट रासायनिक विश्लेषण अहवाल याकामी दाखल झालेला नाही. त्याचप्रमाणे पिडीत बालीका व आरोपी यांचेमध्ये प्रस्थापित झालेले शारीरीक संबंध हे पिडीत बालीका वयाने अज्ञान असतांना झाले असा सुस्पष्ट पुरावा न्यायपटलावर सादर झालेला नाही. अशा परिस्थितीत सदर रासायनिक विश्लेषण अहवालाचा सुध्दा आरोपीविरुध्द अनुमान काढण्यास काहीच उपयोग होत नाही. तसेच ज्यावेळी अभियोग पक्षाची अतिमहत्वाची साक्षीदार म्हणजेच पिडीत बालीका दोषारोपसिद्धीसाठी अभियोग पक्षास दुजोरा देत नाही, त्यावेळी केवळ सदरच्या सर्व कागदपत्रांच्या आधारे आरोपीविरुद्ध कोणतेही ठोस अनुमान काढणे अशक्य आहे.

१८. दोषारोपाच्या शाबितीसाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.५ म्हणजेच अन्वेषण अधिकारी श्री. गणेश जंगले यांच्या पुराव्याचा आधार घेतलेला आहे. निशाणी क्र. ३३ येथे नोंदवलेल्या त्यांच्या पुराव्यात त्यांनी प्रामुख्याने असे कथन केले की, प्रस्तुत खटल्याचे तपासकाम त्यांनी पूर्ण केले आणि दोषारोपात नमूद केलेप्रमाणे आरोपीने गुन्हा केल्याचे त्यांना निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यांच्या तोंडी पुराव्याचा बारकाईने अभ्यास केला असता असे दिसून येते की, त्यांनी दोषारोपामधील अभियोगपक्षाच्या कथनास पूर्ण समर्थन केले आहे. तथापि, या न्यायालयाच्या तर्कसंगत बुद्धीस असे स्पष्टपणे जाणवते की, ज्यावेळी पीडित बालिकेचा पुरावा, जो अत्यंत महत्वाचा व निर्णायक स्वरुपाचा आहे तो, दोषारोप शाबितीसाठी अभियोग पक्षास निरुपयोगी ठरतो, त्यावेळी केवळ अन्वेषण अधिकारी यांच्या समर्थनिय तोंडी पुराव्याच्या आधारे आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्धीचे अनुमान काढणेस अजिबात वाव नाही. कोणत्याही परिस्थितीत प्रस्तुत खटल्यामध्ये अन्वेषण अधिकारी यांचा पुरावा हा पीडित बालिकेच्या पुराव्याला निष्क्रीय व निष्फळ करु

शकत नाही. पीडित बालिकेचा पुरावा डावलून अन्वेषण अधिकारी यांच्या पुराव्याला प्राधान्य देता येणार नाही. त्यामुळे अन्वेषण अधिकारी यांचा तोंडी पुरावा सुद्धा प्रस्तुत खटल्याचे भवितव्य बदलू शकत नाही.

**१९.** आरोपीविरुद्धचा दोषारोप नि:संशयपणे शाबित करण्याची जबाबदारी पूर्णत: अभियोग पक्षाची आहे असे तत्व विशेषत: फौजदारी न्यायदान प्रक्रियेमध्ये स्थिरावलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी दाखल झालेल्या तोंडी व लेखी पुराव्याचा बारकाईने पडताळा घेतला असता असे दिसून येते की, तसा नि:संशय शाबितीचा पुरावा प्रस्तुत आरोपीविरुद्ध याकामी दाखल झालेला नाही. थोडक्यात, आरोपीविरुद्धचे दोषारोप सिद्ध करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रकरणी आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. त्यामुळे वर नमूद विचार प्रकटनाच्या प्रकाशात सर्व वादबिंदूंचे निष्कर्ष त्या त्या प्रमाणे नोंदवून न्यायाचे कारणास्तव पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित ठरेल, असे या न्यायालयाचे मत आहे.

## आदेश

**१)** आरोपी **सचिन विलास सोनटक्के** यांस भारतीय दंड संहिता १८६० कलम ३६३ आणि ३७६(२)(न) तसेच बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ कलम ४ आणि ६ चे दोषारोपातून फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्त केले आहे.

**२)** मुद्देमाल वस्तु म्हणजेच जनुकीय नमुने आणि त्यांचे वेष्टन हे मुल्यहीन असल्याने आवाहनाचा कालावधी संपल्यानंतर कायद्याप्रमाणे त्यांचा नाश करण्यांत यावा.

**३)** आरोपीचे बंधपत्र आणि जामिनपत्र याद्वारे रद्द केले आहे.

**४)** फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये आरोपीने रक्कम रुपये १५०००/- चे बंधपत्र आणि जामिनपत्र या न्यायालयास सादर करावे.

UTTAM MURALIDHAR MUDHOLKAR

Digitally signed by UTTAM MURALIDHAR MUDHOLKAR
Date: 2024.03.13 18:26:10 +0530

(**उत्तम मु. मुधोळकर**)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
गडचिरोली

दिनांक : ११/०३/२०२४

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a) Name of the Stenographer | :- Kishor D. Dudhbaware<br>Stenographer (Grade III) |
| b) Court | :- Additional Sessions Judge,<br>Gadchiroli |
| c) Judgment dictated on | :- 11/03/2024 |
| d) Judgment checked & signed by P.O. | :- 12/03/2024 |
| e) Judgment uploaded on | :- 13/03/2024 |